दैनिक दिव्य मराठी

# पप्पा, तुमच्या वाटेने जाण्यासाठी आशीर्वाद द्या

**मा**झे वडील सीताराम अग्रवाल आज 'सारा' ग्रुपच्या माध्यमातून मोठे बांधकाम व्यावसायिक म्हणून ओळखले जात आहेत. ते जरूर यशस्वी व्यावसायिक ठरले आहेत यात शंका नाही; मात्र त्यांनी आपल्या कुटुंबासाठी घेतलेली अपार मेहनत आणि कष्ट एवढे आहेत की ते आज आमच्या कुटुंबासाठी देवासमान वंदनीय बनले आहेत, तीर्थरूप बनले आहेत.

पुरेसा पैसा असताना आपल्या मुलांसाठी तो खर्च करणे एक वेळ छोटी गोष्ट आहे, भाकरीची भ्रांत असतानाही आमचे लाड पुरविणारे वडील आम्ही पाहिले आहेत. अपार कष्ट, मेहनत घेत असतानाही त्यांनी त्याची झळ मला व माझ्या कुटुंबीयांना कधीच लागू दिली नाही.



पप्पा सीताराम अग्रवाल सोबत रुपेश अग्रवाल, नीलेश अग्रवाल

काम करीत राहा, फळाची अपेक्ष करू नका, हे बऱ्याचदा आपण ऐकतो; मात्र माझे वडील सीताराम अग्रवाल यांनी गीतेतील याच वचनाचे आपल्या जीवनात तंतोतंत पालन केले आहे. त्यांनी केलेल्या संघर्षाचा मी साक्षीदार ठरलो आहे. म्हणूनच तर आज ते दिवस आठवले की डोळे आपोआप पाणावतात. बुलडाण्यासारख्या मागास भागातून येऊन अस्तित्वासाठी, भाकरी कमावण्यासाठी वडिलांचा चाललेला संघर्ष पाहून आम्ही कधीच विचार केला नव्हता की, हे दिवस जाऊन चांगले दिवस येतील. मला आजही आठवते, दिवस-रात्र एक करून पप्पा तुम्ही मेहनत घेत होता. मी लहान असताना एकेदिवशी मी तुम्हाला बॅट आणून देण्याचा हट्ट धरला. मात्र, परिस्थिती अशी होती की, त्या दिवशी दूध आणण्यासाठीही तुमच्याकडे पैसे नव्हते. तुम्ही अशा परिस्थितीतही रात्री बॅट घेऊन आलात. आज या गोष्टीचा विचार येताच भावनांची मनात गर्दी होते. तुम्ही कुठून, कसे पैसे आणले असतील? माझ्यावरच्या प्रेमापोटी तुम्ही अशा अनेक गोष्टी नकळत केल्याही असतील; मात्र मला त्या माहीत नाहीत. म्हणूनच तर मी तुमचा 'तीर्थरूप' असा उल्लेख केला. पप्पा, तुम्ही फटाके, पुस्तके विकण्यापासून ते आज औरंगाबाद शहरातील नामांकित बांधकाम व्यावसायिक म्हणून कमावलेले नाव आमच्यासाठी कौतुकाची, अभिमानाची गोष्ट आहे. मला तुमच्याबद्दल सार्थ अभिमान आहे. पैशापेक्षा तुम्ही माणसं जोडायला महत्त्व देता, तीच खरी संपत्ती मानता. कुणाचेही वाईट न करण्याच्या तुमच्या या स्वभावामुळे आज अशी एकही व्यक्ती तुमच्याकडे बोट दाखवून तुम्हाला कसला दोष देऊ शकत नाही. मनमिळाऊ स्वभाव व प्रामाणिकपणाने पप्पा तुम्ही सर्व जगाला जिंकले. आज बांधकाम व्यवसायात तुम्ही घालून दिलेला आदर्श, शिकवणीवर आम्ही मार्गक्रमण करीत आहोत. कुणाचा घेतलेला एक रुपया का असेना, तो व्याजासह परत करा. पारदर्शी व्यवहार, समजूतदारपणा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सबुरी ठेवा ही तुम्ही घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे आम्ही जीवनभर पाळणार असल्याचे वचन मी आज तुम्हाला देतो. पप्पा, आता तुम्ही आमच्यासाठी एका विशाल वटवृक्षाप्रमाणे छाया देणारे बनला आहात, ज्या वटवृक्षाची फळे आम्ही आज चाखत आहोत. अपयशाला न डगमगता तुम्ही सबुरी बाळगून संघर्षात अविचलपणे उभे राहिलात. आम्हा सर्वांना याचा नेहमीच सार्थ अभिमान राहील. सर्व कुटुंबीयांना तुमची छत्रछाया, प्रेम हवेसे वाटते आम्हा सर्वांच्या जीवनातील तुम्ही अविभाज्य घटक बनला आहात. प्रेम, जिव्हाळा व स्नेहाने तुम्ही सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकल्याने आपला केवळ सहवासही आमच्यासाठी प्रोत्साहन आणि ऊर्जा देणारा ठरतो. तुमचे मार्गदर्शन, आशीर्वादाशिवाय सर्व अधुरे असून पप्पा, तुमची पितृछाया आमच्यावर अशीच कायम राहो. हीच आज 'फादर्स डे' निमित्ताने ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

रूपेश सीताराम आग्रवाल
नीलेश सीताराम आग्रवाल
व समस्त सारा ग्रुप परिवार